# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:25.03.2026** **वारः बुधवार**

---

१ ) पश्चिम आशियातील संघर्षामुळे निर्माण झालेल्या आव्हानांचा सामना करण्यासाठी केंद्र सरकारतर्फे ७ सक्षम कार्य गट स्थापन

सर्व राज्यसरकारांनी केंद्रसरकारला मदत करून टीम इंडिया भावनेने एकत्रितपणे काम कराव, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच आवाहन

२ ) पश्चिम आशियातील परिस्थितीबाबत अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि

श्रीलंकाचे राष्ट्रपती अनुरा कुमारा दिसानायके यांच्या बरोबर पंतप्रधान मोदी यांची दूरध्वनीवरून चर्चा

३ ) गुजरात विधानसभेत समान नागरी कायदा विधेयक २०२६ काल मंजूर यामुळे देशात समान नागरी कायदा लागू करणार , गुजरात हे उत्तराखंड नंतरचे ठरल दुसर राज्य

आणि

४ ) छत्तीसगडमध्ये आजपासून आदिवासी समाजासाठीची पहिली खेलो इंडिया क्रीडा स्पर्धा सुरू होणार

**<u>पंतप्रधान-राज्यसभा</u>**

पश्चिम आशियातील संघर्षामुळे निर्माण झालेल्या आव्हानाचा सामना करण्यासाठी केंद्र सरकारने ७ सक्षम कार्य गट स्थापन केले असून, देशातल्या सर्व राज्यसरकारांनी केंद्रसरकारला मदत करून टीम इंडिया भावनेने एकत्रित काम कराव अस आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल केल. पश्चिम आशियातील संघर्षाबाबत काल पंतप्रधानांनी राज्यसभेत निवेदन दिलं, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी पंतप्रधान मोदी यांनी सांगितल की पश्चिम आशियातील युद्धामुळे उद्भवणाऱ्या विविध संकटाचा सामना करण्यासाठी इंधन , गॅस, खते , पुरवठा साखळी आणि महागाई ,याबाबत धोरण ठरवण्यासाठी केंद्र सरकारने ७ सक्षम विशेष कार्यगट तयार केले आहेत. या भागात शांतता प्रस्थापित करण्यासाठी भारताचा संवाद आणि कूटनीतीवर जास्त भर असल्याच त्यांनी अधोरेखित केल. तसच भारत अमेरिका , इराण आणि इस्राइल देशांच्या सतत संपर्कात राहून संवाद साधत असल्याचही मोदी यांनी सांगितल . या संघर्षाचे परिणाम दीर्घकाळ राहण्याची शक्यता असून, या काळात देशवासियांचा संयम, दृढनिश्चय आणि एकजूट आवश्यक असल्याचं पंतप्रधान म्हणाले.

दरम्यान , पश्चिम आशियातील परिस्थितीबाबत अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना काल दूरध्वनी केला आणि त्यांच्याशी चर्चा केली . पश्चिम आशियातील तणाव कमी

करून लवकरात लवकर शांतता प्रस्थापित करण्यावर भारताचा भर आहे; होर्मुझची सामुद्रधुनी खुली, सुरक्षित आणि सर्वांसाठी उपलब्ध राहणं जगासाठी अत्यावश्यक असल्याचं यावेळी पंतप्रधान मोदी यांच्या वतीने अधोरेखित करण्यात आलं, असं पंतप्रधानांनी आपल्या समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**<u>पंतप्रधान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल श्रीलंकाचे राष्ट्रपती अनुरा  कुमारा दिसानायके यांच्याशी पश्चिम आशियातील युद्धजन्य परिस्थितीवर चर्चा केली तसच जागतिक ऊर्जा सुरक्षा आणि पुरवठा साखळी प्रभावित करणाऱ्या अनेक समस्यांवर ही विचार विनिमय केला . याबाबत पंतप्रधानांनी समाजमाध्यमावर एका संदेशाद्वारे ही माहिती दिली . यावेळी पंतप्रधान  मोदी यांनी भारत आणि श्रीलंका यांच्यातील परस्पर ऊर्जा सहकारी आणि क्षेत्रीय सुरक्षा वाढवण्यासाठी करण्यात येणाऱ्या प्रयत्नांचा आढावा घेतला तसच भारत आणि श्रीलंका या दोन्ही देशांना जनवणाऱ्या विविध आव्हानांचा  एकत्रित मुकाबला करण्याबाबत भारताची वचनबद्धता यावेळी स्पष्ट केली

**<u>प.आशिया ब्रीफिंग</u>**

देशात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा असून एलपीजीचं देशांतर्गत उत्पादन वाढवण्यात आलं आहे, देशातील सर्व तेलशुद्धीकरण कारखाने त्यांच्या पूर्ण क्षमतेनं काम करत आहेत, अशी माहिती काल सरकारच्या वतीनं देण्यात आली. पश्चिम आशियातील ताज्या घडामोडींसंदर्भात काल नवी दिल्लीत घेण्यात आलेल्या आंतर-मंत्रालयीन पत्रकार परिषदेत पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या सहसचिव सुजाता शर्मा यांनी ही माहिती दिली. तसंच नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवून घाबरून जाऊन इंधनाची घाईने खरेदी करणं टाळावं असं आवाहनही शर्मा यांनी केलं. जिथं जवळपासच्या भागात गॅस पाइपलाईनची सुविधा उपलब्ध आहे, अशा निवासी शाळा आणि महाविद्यालयांना  तसंच सामुदायिक आणि अंगणवाडी स्वयंपाकघरांना येत्या ५ दिवसांत पाईपद्वारे गॅसचा पुरवठा करण्याची व्यवस्था करावी असे निर्देश गॅस वितरण कंपन्यांना देण्यात आले आहेत, असंही त्यांनी सांगितलं. पीएनजीच्या विस्ताराबात माहिती देताना सोमवारी एका दिवसात साडेसात हजार घरगुती आणि व्यावसायिक कनेक्शन्स देण्यात आल्याचं त्या म्हणाल्या.

दरम्यान 45 हजार मेट्रिक टन एलपीजीसह पाइन गॅस तर जवळपास 47 हजार 600 मेट्रिक टन एलपीजीसह जग वसंत ही जहाजं होर्मुझची सामुद्रधुनी पार करून भारताकडे येत आहेत, असं बंदरं, जहाज वाहतूक आणि जलमार्ग विभागाचे विशेष सचिव राजेश कुमार यांनी सांगितलं.

राजनाथ सिंह

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी काल नवी दिल्लीत सैन्य दलांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत घेतलेल्या बैठकीत पश्चिम आशियातील परिस्थितीचा तसंच भारताच्या संरक्षण सज्जतेवर त्यामुळे होणाऱ्या परिणामांचा आढावा घेतला. या बैठकीला सरसेनाध्यक्ष, तिन्ही सैन्य दलांचे प्रमुख, संरक्षण विभागाचे तसंच संरक्षण उत्पादन विभागाचे सचिव, डीआरडीओचे अध्यक्ष उपस्थित होते. यावेळी राजनाथ सिंह यांना जागतिक आणि प्रादेशिक पातळीवरील सुरक्षेच्या स्थितीची तसंच पश्चिम आशियात सध्या वाढत

असलेल्या संघर्षाचा भारतावर होणारा परिणाम आणि सध्याच्या भू-राजकीय परिस्थितीमुळे निर्माण झालेली आव्हानं आणि संधी याबद्दल माहिती देण्यात आली. या परिस्थितीमुळे सध्या भारताकडे असलेल्या संरक्षण उपकरणांच्या देखभाल आणि सर्व्हिसिंगसह  संरक्षण उपकरणांची खरेदी आणि उत्पादनाच्या बाबतीत पुरवठा साखळीवर व्यवस्थापन होणाऱ्या परिणामांचाही ऊहापोह करण्यात आला.

**<u>विषेयक गुजरात</u>**

गुजरात विधानसभेत काल ७ तासांच्या चर्चे नंतर समान नागरी कायदा विधेयक २०२६  मंजूर करण्यात आल. यामुळे देशात समान नागरी कायदा लागू करणार  गुजरात हे उत्तराखंड  नंतरचे दुसरे राज्य ठरले आहे . या समान नागरी कायद्यात धर्माची पर्वा न  करता विवाह , घट स्फोट , लीव्ह इन रिलेशनशिप आणि कौटुंबिक उत्तराधिकार  याबाबत समान नियम लागू करण्याचा प्रस्ताव आहे . गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी हे विधेयक विधानसभेत मांडल. घटनेच्या मूलभूत तत्वांवर आधारित एकात्मिक कायदा लागू करण्याच्या दृष्टीने हे महत्वाच पाऊल असल्याच पटेल यांनी यावेळी सांगितल.

**<u>सर्वोच्चन्यायालय</u>**

हिंदू, शीख किंवा बौद्ध धर्माची अनुयायी असणारी व्यक्तीच अनुसूचित जाती आणि जमाती दर्जासाठी दावा करू शकेल, असा निवाडा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. ख्रिस्ती धर्मासारख्या इतर कोणत्याही धर्मात धर्मांतर करणाऱ्या व्यक्तिचा अनुसूचित जाती दर्जा रद्द होईल, या तीन धर्मांव्यतिरिक्त इतर धर्मांत धर्मांतर केलेली कोणतीही व्यक्ती अनुसूचित जाती आणि जमातींवरच्या अत्याचार प्रतिबंधक कायद्याचं उल्लंघन झाल्याचा दावा करू शकत नाही, असं न्यायालयाने म्हटलं आहे. आंध्र प्रदेशातल्या एका ख्रिस्ती धर्मगुरूने केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायमूर्ती पी. के. मिश्रा आणि न्यायमूर्ती मनमोहन यांच्या खंडपीठाने हा निवाडा दिला आहे.

**<u>रेल्वे</u>**

भारतीय रेल्वेनं आरक्षित तिकीट रद्द करण्याच्या नियमात बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार आता, प्रवासाला ८ तास शिल्लक असताना रेल्वेचं तिकिट रद्द केलं, तर कुठलाही परतावा मिळणार नाही. प्रवास सुरू होण्याच्या अर्धा तास आधीपर्यंत प्रवास सुरू करण्याचं ठिकाण बदलण्याची सुविधा रेल्वेनं आता उपलब्ध करून दिली आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

**<u>मदत</u>**

छत्तीसगडमध्ये आज दीनदयाळ उपाध्याय भूमिहीन कृषी मजूर कल्याण योजनेअंतर्गत मुख्यमंत्री विष्णु देव साई यांच्या हस्ते सुमारे ५ लाख शेतमजूरांना सुमारे ५ शे कोटी रुपयांचा मदत निधी थेट त्यांच्या बँक खात्यात वितरित करण्यात येणार आहे . ग्रामीण भागातील सर्वात दुर्बल  घटकांना  आर्थिक साहाय्य देण्याच्या राज्य सरकारच्या प्रयत्नांचा हा एक भाग आहे . या योजनेसाठी पात्र असणाऱ्या शेतमजुरांना

दरवर्षी राज्य सरकारच्यावतीने १० हजार रुपयांची मदतदेण्यात येणार असून,ती त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे .

**टीबी-एनओए**

टी बी अर्थात क्षयरोग हे अत्यंत गंभीर आव्हान असून केवळ सरकारला किंवा फक्त वैद्यकीय समुदायाला ही समस्या हाताळणं कठीण असल्याचं विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी म्हटलं आहे. काल जागतिक क्षयरोग दिन होता, त्या पार्श्वभूमीवर , क्षयरोगावर प्रमाणित उपचारपद्धतीला आयुर्वेदाची जोड देण्यासंदर्भात प्रथमच वैज्ञानिक पद्धतीनं अभ्यास करण्यात येणार असल्याची घोषणा काल नवी दिल्ली इथं करण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. आयुष मंत्रालय आणि जैव तंत्रज्ञान विभागानं सहकार्यानं हाती घेतलेल्या या उपक्रमात क्षयरोग उपचारांसाठी आयुर्वेद पूरक ठरू शकेल का याचं शास्त्रीय पद्धतीनं परीक्षण करण्यात येणार आहे. क्षयरोग निर्मूलनासाठी अधिक व्यापक सामूहिक प्रयत्नांची गरज डॉ. जितेंद्र सिंह यांनी व्यक्त केली

**खेलो इंडिया**

छत्तीसगड मध्ये आजपासून आदिवासी समाजासाठीची पहिली खेलो इंडिया क्रीडा स्पर्धा सुरू होत आहे, ती ३ एप्रिल पर्यंत चालेल .केंद्रीय क्रीडा आणि युवक कल्याण मंत्री मनसुख मांडविय यांच्या हस्ते आज रायपूर इथ या स्पर्धांच उद्घाटन होणार आहे . छत्तीसगडमधील रायपूर , जगदलपुर आणि अंबिकापुर या तीन शहरात या स्पर्धांच आयोजन करण्यात आल असून , ॲथलेटिक्स, हॉकी ,फुटबॉल, तीरंदाजी, कुस्ती,भारोत्तोलन आदि ७ प्रकारात या स्पर्धा होणार आहेत .तसच मल्लखांब आणि कबड्डी यांचा प्रदर्शन खेळ म्हणून समावेश करण्यात आला आहे . या स्पर्धांमध्ये देशातल्या ३० राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील ३० हजारांपेक्षा जास्त आदिवासी खेळाडू सहभागी होणार आहेत .

# याबरोबच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल , नमस्कार